दाखल दिनांक : २२/०१/२००७
नोंदणी दिनांक : २२/०१/२००७
निकाल दिनांक : १८/०२/२०१५
कालावधी : दि. म. वर्ष
२६—००— ०८

**सह दिवाणी न्यायाधिश,कनिष्ठ स्तर,कळवण,ता.कळवण,जि.नाशिक यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी— एस.पी.पैठणकर )**

**नियमित दिवाणी मुकदमा क.०७/२००७.** **निशाणी क.१७२**

१. ताराबाई भास्कर वाघ
वय :४६ वर्षे, धंदा : नोकरी
२. शिरिष उर्फ गिरीष भास्कर वाघ
वय :२६ वर्षे, धंदा : व्यवसाय
३. कविता भास्कर वाघ उर्फ
कविता सुरेश पिठे
वय:२३ वर्षे, धंदा:घरकाम
रा. शिवपाडा पोस्ट हटटी,
ता सुरगाणा,जि.नाशिक,
४. सुभाष भास्कर वाघ
वय :२० वर्षे, धंदा : नोकरी
वादी अ.क्र.१,२ व ४ रा.एकलव्यनगर
देवळा,ता.देवळा,जि.नाशिक **... वादी**

**विरूध्द्**

१. एकनाथ नारायण वाघ (**मयत**)
१.अ. श्रीमती मिराबाई एकनाथ वाघ
वय : ६०, धंदा : घरकाम
१.ब. विक्रम एकनाथ वाघ
वय : ४०, धंदा : शेती व नोकरी
१.क. निवृत्ती एकनाथ वाघ
वय : ३५, धंदा : नोकरी
१.ड. उध्दव एकनाथ वाघ
वय : ३०, धंदा : शेती
१.इ. बेबीबाई प्रकाश दळवी
वय : ३३, धंदा : घरकाम
१.ई. नंदा एकनाथ वाघ
वय : २५, धंदा : घरकाम
अ.क्र.१.अ. ते १.क. आणि
अ.क्र.१ई रा.एकलव्यनगर ता.देवळा,जि.नाशिक
अ.क्र.१ब. रा.ह.टिटवाळा पुर्व श्री दर्शन बिल्डींग

दहीवडा,ता.कल्याण,जि.ठाणे

२. वच्छलाबाई भावराव गवळी(**मयत**)

२.अ जगन भावराव गवळी
वय : ६०, धंदा : शेती

२.ब वणजी भावराव गवळी
वय : ५५, धंदा : नोकरी

२.क. कारभारी भावराव गवळी
वय : ४९, धंदा : नोकरी

२.ड रखमाबाई बाबुराव गांगुर्डे
वय : ५१, धंदा : शेती
वादी क्र.२.अ ते २.क
रा.कळवण खुर्द, ता.कळवण,जि.नाशिक
वादी क्र.२.ड रा.मु.पो.कुंडाणे(ओ.)
ता.कळवण, जि.नाशिक

३. आक्काबाई राजाराम गायकवाड
वय : ४५, धंदा : शेती / घरकाम
रा. वासुळ ता.देवळा जि नाशिक

४. विमलबाई राजाराम माळी
वय : ४२, धंदा : शेती /घरकाम
रा. द—हयाणे ता.सटाणा,जि.नाशिक

५. चंद्रभागाबाई गंगाराम पवार(**मयत**) .......**प्रतिवादी.**

५.अ. मंगला भावुलाल सोनवणे
वय : ५९, धंदा : नोकरी
रा. नाशिकरोड,जेलरोड,वीर
सावरकरनगर,नाशिक

५.ब. जिजाबाई रामचंद्र राजपुत,
वय : ५६, धंदा : शेती
रा. चेहडी ता.निफाड,जि.नाशिक

५.क. निंबा गंगाराम पवार,
वय : ५४, धंदा : नोकरी
रा.उमराणे मळयात परसुल
तलावाशेजारी,ता.देवळा,जि.नाशिक

**न्यायालयीन वाटप, कब्जा व कायम मनाई हुकूम मिळणेकरीता**

— — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — —

| | | |
|---|---|---|
| श्रीमती.एस.आर.बच्छाव | : | वादींतर्फे वकिल. |
| श्री.यु.एच.आहेर | : | प्रतिवादी क्र.१ तर्फे वकिल |
| श्रीमती.ए.एस.पगार | : | प्रतिवादी क्र.२तर्फे वकिल |
| श्री.आर.एन.बागुल | : | प्रतिवादी क्र.३ व ५ तर्फे वकिल |
| एकतर्फी | : | प्रतिवादी क्र. ४ साठी |

---

## न्या य नि र्ण य

(.....आज रोजी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५.....)

०१. प्रस्तुतचा दावा हा वाटप, कब्जा तसेच कायम मनाई ताकिदीसाठी सादर केला आहे.

०२. वाद पत्रातील वस्तुस्थिती संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे:—

वादींच्या कथनाप्रमाणे वाद मिळकती या वडिलोपार्जीत एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. आजपर्यंत वाद मिळकतींचे वाटप झालेले नाही. मयत नारायण हे प्रतिवादी क्र.१ चे वडील असुन मयत भास्कर हे प्रतिवादी क्र.१ चे सख्खे भाउ् आहे. नारायण याला दोन मुले म्हणजेच प्रतिवादी क्र.१ व मयत भास्कर होते. भास्कर हे नोकरी निमित्त कोसुर्डे व सुरगाणा तालुक्यात घागबारी व सिन्नर तालुक्यात पुतळेवाडी येथे राहत होते. मयत भास्कर हा बाहेरगावी राहत असल्यामुळे वडिलोपार्जीत शेत जमीनी मयत भास्कर चे मोठे बंधु प्रतिवादी क्र.१ यांच्या कब्जे वहिवाटीत होते. दि.२८/०१/१९७४ रोजी मयत कै.नारायण याने गट नं.६१२ ही मिळकत जगन्नाथ नामदेव व इतर यांच्याकडुन विकत घेतली. त्यानुसार नोंद नं.१०९ मंजुर झाली. परंतु कै.नारायण गहिणा वाघ याचा दि.०६/०२/१९८४ रोजी मृत्यु झाल्यामुळे वारस हक्काने प्रतिवादी क्र.१ याचे नाव वाद मिळकत गट नं.६१२ ला लागले. प्रतिवादी क्र.१ हा एकत्र कुटुंबाचा कर्ता म्हणुन कारभार पाहत होता. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांची आई दि.२४/०१/१९८९ रोजी मयत झाली. तसेच भास्कर नारायण वाघ याचा दि.३०/११/१९९२ रोजी मृत्यु झाला.

०३. वादींनी पुढे असे कथन केले की, वाद मिळकत गट नं.४४३/ब/३ व गट नं.६१२ या मिळकती एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जीत मिळकती असुन त्यात वादींचा हिस्सा व हक्क आहे. वादींनी प्रतिवादींकडे वाटणीची मागणी केली असता प्रतिवादी क्र.१ याने वादींना हिस्सा देण्यास नकार दिला. तसेच वाद मिळकत दुस—या इसमास विक्री करेल, असे प्रतिवादी क्र.१ याने वादींना सांगितले. यावरून वादींना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले. सबब, दावा मागणीप्रमाणे मंजुर करावा, अशी विनंती वाद पत्रात केली आहे.

०४. वाद समन्स (नि.३४) अन्वये समन्स बजावणी होवुनही प्रतिवादी क्र.४ दाव्यात हजर झाला नाही. त्यामुळे दि.२४/०७/२००९ रोजीच्या आदेशान्वये प्रतिवादी क्र.४ विरूध्द सदरचा दावा एकतर्फी चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.५ चे वारस यांनी पुरसिस (नि.१५०), प्रतिवादी क्र.३ व ५ यांनी पुरसिस (नि.२५) व प्रतिवादी क्र.२ यांनी पुरसिस (नि. २७) तसेच प्रतिवादी क्र.२ हिच्या वारसांनी पुरसिस (नि.१५४) सादर करून दावा मान्य व कबुल केला आहे. तसेच वादींच्या लाभात हुकूमनामा करावा, अशी विनंती केली आहे.

०५. वाद पत्रातील सर्व अभिकथन नामंजुर करून प्रतिवादी क्र.१ याने लेखी कैफियत (नि.१७) सादर करून त्यात असा बचाव घेतला की, वाद मिळकतीच्या चतु:सिमा योग्य व बरोबर नाही. दाव्यास योग्य व कायदेशीर कोर्ट फी स्टॅम्प लावला नाही. वाद मिळकत गट नं.६१२ ही मिळकत मयत वडील नारायण वाघ यांच्या नावाने प्रतिवादी क्र.१ याने संपुर्ण रक्कम २०००/—रू. स्वत: देवुन खरेदी केली आहे. वाद मिळकत गट नं. ६१२ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ याची स्वकष्टार्जित मिळकत आहे. वाद मिळकत गट नं. ४४३ब/३ ही मिळकत कै.नारायण वाघ याने प्रतिवादी क्र १ यास विक्री केली आहे त्यामुळे सदरची मिळकत प्रतिवादी क्र.१ याची स्वकष्टार्जित मिळकत आहे. वादींनी इतर वडिलोपार्जीत मिळकतींचा दाव्यात उल्लेख केला नसल्यामुळे दावा खारीज होण्यास पात्र ठरतो.

०६. प्रतिवादी क्र.१ याने पुढे असा बचाव घेतला की, त्याने वाद मिळकतीत ७५,०००/— रू. खर्च करून सपाटीकरण केले आहे. वाद मिळकतींवर वादींचा कब्जा नाही. तसेच वादी क्र.१ हिचे पती नोकरीला असल्याकारणाने त्यांना मोठया प्रमाणावर जंगम मिळकत मिळवलेली आहे. वादींना पेन्शन मिळत आहे. वादींनी जंगम मिळकतींचा उल्लेख दाव्यात केला नाही. वादींचा १/२ हिस्सा वाद मिळकतीत नाही. सबब या वाद बचावासह दावा खर्चासह खारीज करावा, अशी विनंती लेखी कैफियतमध्ये केली आहे.

०७. माझे पुर्वाधिकारी यांनी निश्चित केलेले मुददे (नि.३६) हे मी परत मांडुन त्यावरील कारणमिमांसा व निष्कर्षासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| <u>मुददे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दावा मिळकत वादी आणि प्रतिवादी यांची एकत्रीत कुटूंबाची मिळकत असुन त्याची सरसनिरस वाटणी झाली, ही बाब वादींनी शाबीत केली आहे काय ? | ....होय |
| २. | असल्यास दावा मिळकतीत वादींचा वाटा किती ? | ....होय. |
| ३. | गट नं.६१२ व ४४३ब/३ या प्रतिवादी क्र.१ च्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत काय ? | ....नाही. |
| ४. | दाव्यात मौजे देवळा ग्रामपंचायत हददीतील वडिलोपार्जित घर न आणल्यामुळे दाव्यास बाधा येईल काय ? | .....होय. |
| ५. | दावा मिळकतीच्या विकासाकरीता प्रतिवादी क्र.१ ने ७५,०००/—रू. खर्च केले, ही बाब प्रतिवादी क्र.१ ने शाबीत केली काय ? | .... नाही |
| ६. | वादी वाटणीच्या व कब्जाच्या हुकूमनाम्यास पात्र आहे काय ? | .....नाही. |
| ७. | आदेश व हुकुमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

०८. वादपत्रातील अभिकथने सिद्ध करण्यासाठी वादींपैकी वादी क्र.१ हिने स्वत:ला (वा.सा.१) श्रीमती ताराबाई भास्कर वाघ (नि.६६) अन्वये तपासून सरतपासणीचे शपथपत्र सादर केले. (वा.सा.१) हिच्या तोंडी पुराव्याला अधिक पुष्ठी मिळण्यासाठी वादींनी इतर साक्षीदारांना अभिलेखावर तपासले नाही. शेवटी, पुरसिस (नि.९१) सादर करून वादींनी तोंडी पुरावा बंद केला.

वादींनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा खोडुन टाकण्यासाठी प्रतिवादी क्र.१अ याने स्वत:ला (प्र.सा.१) तपासुन (नि.११३) अन्वये सरतपासणीचे शपथपत्र सादर केले. तसेच (प्र.सा.१)याचे पुराव्याला अधिक पुराव्याचे पाठबळ मिळण्यासाठी (प्र.सा.२) श्री.निवृत्ती एकनाथ वाघ यास (नि.१२५) अन्वये तपासले.

### <u>मुददा क्र.१ ते ४ बाबत :—</u>

०९. उपरोक्त सर्व मुदद्े ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे लांबण टाळण्यासाठी ते चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे. वाद मिळकत गट नं.४४३/ब/३ व गट नं.६१२ हया वडिलोपार्जीत मिळकती आहेत, हे सिद्ध करण्यासाठी वादींनी (वा.सा.१) यास तपासले. सदर साक्षीदाराने वाद पत्रातील अभिकथनाप्रमाणे पुनरार्वत्ती केली आहे. (वा.सा.१) हिच्या तोंडी पुराव्याला अधिक पुष्ठी मिळण्यासाठी नोंद नं. १०२८ (नि.१६५), नोंद नं.११२९ (नि.१६६), नोंद नं.१०२७ (नि.१६७), ७/१२ उतारा (नि.१६९), (नि.१७०), (नि.१७१) अन्वये कागदपत्रे सादर केले आहेत. या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता वाद मिळकती कै. नारायण यांच्या मालकीच्या असल्याचा उल्लेख केला असुन आजरोजही सुद्धा या मिळकतींवर कै.नारायण यांचे नाव असल्यामुळे सदरहु मिळकती वडिलोपार्जीत मिळकत असल्याचे सदर कागदपत्रांवर सिद्ध झाले.

१०. वाद मिळकत गट नं.४४३/ब/३ ही प्रतिवादी क्र.१ याने त्याचे वडील कै. नारायण वाघ यांचेकडुन खरेदी केली, हे सिद्ध करण्यासाठी (प्र.सा.१) व (प्र.सा.२) याच्या तोंडी पुराव्याच्या पुष्ठयार्थ एकही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. याउ्लट (प्र.सा.१) व (प्र.सा.२) याने उलटतपासात कबुल केले की वाद मिळकत गट नं.४४३/ब/३ ही आजरोजी वडिलोपार्जीत मिळकत आहे. तसेच, वाद मिळकत गट नं.६१२ ही मिळकत विकत घेण्यासाठी प्रतिवादी क्र.१ याने त्याचे पत्नीचे दागदागिणे विक्री करून २,०००/—रू. च्या मोबदल्यात त्याचे वडिल कै.नारायण वाघ यांच्या नावाने खरेदी केली व ती मिळकत त्याची स्वकष्टार्जीत मिळकत आहे, हा प्रस्थापित केलेला वाद बचाव सिद्ध करण्यासाठी तोंडी पुराव्याच्या पृष्ठयार्थ एकही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. तसेच, इतर मिळकती म्हणजेच, गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट.नं.७०८ या मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झाले आहे, यावर वादींनी कोणताच पुरावा सादर केला नाही. यास्तव या मिळकती वडिलोपार्जीत आहेत, हे (वा.सा.१), (प्र.सा.१) व (प्र.सा.२) यांच्या मुखातुन उलटतपासात सिद्ध करून घेतले. यास्तव, गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट नं. ७०९ हया मिळकती ग्राम.देवळा, ता.देवळा, जि.नाशिक येथील मिळकती आहेत, हे प्रतिवादींनी नमुना नं.८—'अ' चे उतारे प्रत्येकी (नि.१२८), (नि.१२९), (नि.१३०) व (नि. १३१) सादर केले आहेत. या सर्व उता—यांचे अवलोकन केले असता, सर्व मिळकती हया ग्राम.देवळा, ता.देवळा, जि.नाशिक येथील असल्याचे उल्लेख केला आहे.

११. तसेच गट नं.६९७ व ६९८ या मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र.१ यांची घरे असुन तेथे ते राहत असले तरी आजरोजी त्या मिळकती वडिलोपार्जीत मिळकती आहेत, हे वादी व प्रतिवादींनी उलटतपासात कबुल केले आहे. यास्तव गट नं.७०७ व ७०८ या मिळकती मयत प्रतिवादी क्र.१ याच्या स्वसंपादित मिळकती आहेत, असा पुरावा प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सादर केला. परंतु वादींनी (प्र.सा.१) व (प्र.सा.२) यांना उलटतपासात गट नं.७०७ व गट नं.७०८ मध्ये वादी व प्रतिवादी राहत असुन त्या मिळकती मयत प्रतिवादी क्र.१ याच्या स्वकष्टार्जित मिळकत नाही, असा सुचनात्मक प्रश्न विचारला असता त्यास दोन्ही साक्षीदारांनी नकारात्मक उत्तरे दिली म्हणजेच गट नं.७०७ व ७०८ या मिळकती

वडिलोपार्जीत मिळकती आहेत, अस वादींचे कथन आहे. या खेरीज (प्र.सा.१) याने उलटतपासात कबुल केले की, मिळकत नं.७०८ मध्ये (वा.सा.१) राहत आहे व मिळकत नं. ७०७ व गट नं.७०८ यांचा सि.टी.सर्व्हे नं.३४ असुन सरकारी अभिलेखात कै.नारायण यांचे नाव आहे, हे सुद्धा (प्र.सा.१) व (प्र.सा.२) यांनी उलटतपासात कबुल केले आहे जे की, यावर वादींनींच प्रतिवादींच्या दोन्ही साक्षीदारांना उलटतपासात प्रश्न विचारले आहे. सबब उपरोक्त विवेचनावरून, गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट नं.७०९ हया मिळकती ग्राम.देवळा, ता.देवळा, जि.नाशिक येथील मिळकती असुन वडीलो पार्जीत आहेत, हा प्रस्थापित केलेला वाद बचाव प्रतिवादींनी सिद्ध केला आहे.

१२. तसेच गट नं.४४३/ब/३ व गट नं.६१२ या मिळकती वडिलोपार्जीत आहेत, हे वादींनी सिद्ध केले आहे. परंतु गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट नं.७०९ हया मिळकती ग्राम.देवळा, ता.देवळा, जि.नाशिक येथील मिळकती असुन वडीलोपार्जीत असुनही प्रतिवादी क्र.१ याने लेखी कैफियत सादर केल्यापासुन ते सदर दाव्याचा अंतिम लागेपर्यंत हया मिळकतींना दाव्यात सामील केले नाही. वादींना मिळालेल्या पुरेशा अवधीचा त्यांनी पुरेपुर वापर करून एकही अर्ज सादर न करता सदर मिळकतींना दाव्यात सामील करण्यासाठी निष्फळ प्रयत्न केले नाही. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने ब—याच न्यायनिर्णयात असा दृष्टीकोन घेतला की, वाटणीच्या दाव्यात सर्व वडिलोपार्जीत मिळकती सामील केल्या नाही तर दावा चालु शकत नाही. अश्या वेळेस वडिलोपार्जीत मिळकतींची वाटणी एकदाच होते. त्यामुळे गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट नं.७०८ हया मिळकतींचे वादी व प्रतिवादींमध्ये सरसनिरस मानाने वाटप झाले होते व त्याप्रमाणे तो कब्जे वहिवाटीत आहे, यावर वादींनी अथवा प्रतिवादींनी पुरावा सादर केला नाही. उपरोक्त विवेचनावरून व एकंदर पुराव्याचा साकल्याने विचार केला असता यावर माझे असे ठाम मत आहे की, वाद मिळकत गट नं.४४३/ब/३, गट नं६१२ या मिळकती वडिलोपार्जीत असुन त्यावर वादींचा १/२ हिस्सा असुन हक्क आहे, हे जरी सिद्ध केले तरी अंशत: वडिलोपार्जीत मिळकतींची वाटणी होणे शक्य नाही. सबब गट नं.६९७, गट नं.६९८, गट नं.७०७ व गट नं.७०८ ग्रामपंचायत,देवळा,ता.देवळा, जि.नाशिक येथील मिळकती दाव्यात सामील न

केल्यामुळे पुढे भविष्यात पुन्हा या मिळकतींवरून वादी व प्रतिवादींमध्ये वाटणीचा वाद उपस्थितीत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच, आज रोजी वाद व प्रतिवादी हे दाव्यात सामील न केलेल्या मिळकतींबददल भविष्यात वाटणीबददल वाद उपस्थितीत होवू देणार नाही, यावर दोन्ही पक्षकारांनी पुरावा सादर केला नाही. परिणामी, ग्रामपंचायत, देवळा, ता.देवळा जि.नाशिक येथील मिळकती सदरच्या दाव्यास सामील न केल्यामुळे दाव्यास बाधा निर्माण होवून दावा कायदेशीर चालु शकत नाही. त्यामुळे मुददा क्र. १ व ४ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मुददा क्र. २ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुददा क्र.५ बाबत :—**

१३. वाद मिळकतीत विकासाकरीता प्रतिवादी क्र.१ याने ७५,०००/— रू.खर्च केले, हे सिद्ध करण्यासाठी (प्र.सा.१) व (प्र.सा.२) यांच्या तोंडी पुराव्याच्या पृष्ठयार्थ इतर कोणाला तपासले नाही. तसेच वाद मिळकतीवर केवळ प्रतिवादी क्र.१ याचा ताबा होता, हे सिद्ध करण्यासाठी कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. यास्तव वाद मिळकतीच्या जमीनीच्या लगतच्या कास्तकारांना वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ व त्याच्या वारसांचा ताबा होता/आहे, हे सिद्ध करण्यासाठी स्वंतत्र साक्षीदार तपासला नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ याने वाद मिळकतीत कोणकोणते विकास केले आहेत जेणे करून त्यांना ७५,०००/—रू. खर्च लागला आहे, हे सिद्ध करण्यासाठी प्रतिवादींनी तोंडी पुराव्याला अधिक पुराव्याचे पाठबळ दिले नाही. करीता, सदर प्रस्थापित केलेला बचाव सिद्ध करण्यासाठी (प्र.सा.१) व (प्र.सा.२) यांचा पुरावा अपुरक आहे. परिणामी, वाद मिळकतीत विकासाकरीता प्रतिवादी क्र.१ याने ७५,०००/—रू. खर्च केला, हे प्रतिवादी क्र.१ पुराव्याअभावी सिद्ध करण्यास अपयशी ठरला. सबब मुददा क्र.५चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुददा क. ६ व ७ बाबत</u> :—**

१४. मुददा क्र.४ च्या होकारार्थी निष्कर्षामुळे वादींनी इतर वडिलोपार्जीत घरे व मिळकती दाव्यात सामील न केल्यामुळे दाव्यास बाधा निर्माण झाली. त्यामुळे वादी मागणीप्रमाणे अनुतोष मिळकण्यास अपात्र ठरतात. तसेच दोन्ही पक्षकारांमधील जवळचे नातेसबंध लक्षात घेता व त्यांच्या संबंधात भविष्यात आणखी बिघाड होवु नये या करीता त्यांनी आपापला खर्च सहन करावा, असा आदेश पारीत करणे उचित ठरेल. सबब मुददा क्र.६चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुददा क्र.७च्या निष्कषार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. दावा खर्चासह खारीज करण्यात येत आहे.

२. दोन्ही पक्षकारांनी आपापला खर्च सहन करावा.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

दिनांक :१८/०२/२०१५

( एस.पी.पैठणकर )
सह दिवाणी न्यायाधिश,क.स्तर,कळवण,
ता.कळवण, जि.नाशिक